मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 29 नोव्हेंबर 2025 | पान- 1

# वारसा वडिलांचा, ध्येय विकासाचे!

# तरुण नेतृत्वाचे पाऊल: यश साने.

विकसनशील प्रभाग : ०१

पिंपरी | प्रतिनीधी : चिखली भागातील जनतेचे प्रश्न तीनदा लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येऊन सोडवणारे स्वर्गीय दत्ता काका साने यांचा राजकीय आणि सामाजिक वारसा आता त्यांचे चिरंजीव यश साने पुढे घेऊन जात आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये सर्वात तरुण उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले यश साने यांच्यासमोर वडिलांनी जपलेला लोकसेवेचा वसा पुढे नेण्याचे मोठे आव्हान आहे, पण आज ते हे आव्हान समर्थपणे पेलायला सज्ज झाले आहेत. प्रभाग एक मधील विकासाचे ध्येय ठेवून त्यांनी निवडणुकीची पूर्वतयारी सुरु केली आहे. मतदारांनी संधी दिल्यास, साथ दिल्यास नक्कीच नगरसेवक म्हणून नव्हे तर जनसवेक म्हणून कार्य करू अशी भावनिक साद त्यांनी घातली आहे.




## आश्वासक तरुण चेहरा

यश साने यांच्याकडे एक तरुण आणि आश्वासक चेहरा म्हणून मोठ्या आशेने पाहिले जात आहे. 'वीर अभिमन्यु मित्र मंडळा'च्या माध्यमातून त्यांचा सामाजिक कार्यात कायम सक्रिय सहभाग राहिला आहे.

धार्मिक सण-समारंभांचे महत्त्व ओळखून त्यांनी गणेशोत्सव, दहीहंडी, नवरात्रोत्सव, आणि दांडियाच्या निमित्ताने विविध उपक्रम राबवून सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे.

## जनतेचे आरोग्य आणि सक्षमीकरण

केवळ उत्सवांपुरते मर्यादित न राहता, त्यांनी जनतेच्या आरोग्याकडेही विशेष लक्ष दिले आहे. रक्तदान शिबिरे आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिरांच्या माध्यमातून त्यांनी आरोग्यसेवा लोकांपर्यंत पोहोचवली आहे. विशेषतः, महिला सक्षमीकरणावर त्यांचा भर आहे. महिलांसाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करून त्यांच्या कला-गुणांना वाव मिळवण्यासाठी यश साने यांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले जातात. मोफत ड्रायव्हिंग, कलाकुसरीचे प्रशिक्षण यासह जेष्ठांसाठीचे कार्य मोलाचे आहे.





## वारसा विकासाचा, संकल्प समस्या निवारणाचा

दत्ता काका साने यांनी चिखलीत अनेक महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्प आणले. त्यामध्ये संत साहित्याचा अभ्यासक्रम असणारे नावाजलेले संतपीठ सुरु कऱण्यामध्ये त्यांचा मोठा वाटा आहे. टाळगांव चिखलीची सुशोभित कमान ज्यामुळे गावाची ओळख कायम राहणार आहे. ही कमान पूर्णत्वास नेण्याचे काम स्वर्गीय दत्ता काका साने यांनी केले. महापालिकेकडे पाठपुरावा केला. बैलगाडा मालकांसाठी महत्त्वपूर्ण असलेला चिखलीतील बैलगाडा घाटाचे काम, म्हेत्रेवस्ती येथील रूग्णालय, पिंपरी-चिंचवडमधील पहिली अत्याधुनिक सोयी-सुविधांनी युक्त महानगरपालिकेची शाळा चिखलीत सुरू करण्याचे श्रेय त्यांना लाभले आहे. आता हा विकास वारसा पुढे नेताना, वाढत्या विकासासोबत वाढणाऱ्या समस्या सोडवण्यावर यश साने यांचा भर असणार आहे.

समाजातील तरुण, महिला, आणि ज्येष्ठ नागरिक



यांच्यासाठी विविध उपक्रम आणि प्रभावी योजना राबवण्याचा त्यांचा मानस आहे. वडिलांकडून लाभलेला भक्कम राजकीय आणि सामाजिक वारसा, तसेच स्वबळावर केलेले कार्य यामुळे यश साने यांना निश्चितपणे उमेदवारी मिळेल आणि जनतेची त्यांना साथ लाभेल, असा विश्वास चिखलीच्या जनतेला आहे. तरुण नेतृत्वाच्या माध्यमातून चिखलीच्या विकासाची नवीन पहाट सुरू होण्याची आशा आहे.